# ज. ए. इ. ची प्राथमिक शाळा

## सुभेदार वाडा, कल्याण (प.)

## * वार्षिक अहवाल *

### सन २०१८-१९

सस्नेह नमस्कार,

जनरल एज्युकेशन इन्स्टिटयूटची प्राथमिक शाळा, सुभेदार वाडा, गांधी चौक, कल्याण (प.) सन २०१८-१९ चा आपला वार्षिक अहवाल सादर करीत आहे.

जून १९८५ साली ज. ए. इ. ची प्राथमिक शाळा सुरू झाली.

* सध्या आपल्या शाळेत एक मुख्याध्यापिका, १६ वर्गशिक्षिका, १ सेविका तसेच संस्था पातळीवर १ संगीत शिक्षिका, २ जादा शिक्षक, २ लेखनिक व ५ सेविका कार्यरत असून शाळेच्या १० वर्ग खोल्या, प्रशस्त हॉल, स्वच्छतागृह, पाण्याचे कुलर, खेळाचे मोठे मैदान, संगणक कक्ष या सर्वांचा लाभ एकूण ८७१ विद्यार्थी घेत आहेत. शिवाय सुरक्षिततेच्या दृष्टीने सी. सी. टी. व्ही. कॅमेरे बसविण्यात आले आहेत.
* गेल्या ८ वर्षापासून आपल्या शाळेत इ. १ ली ते ४ थी च्या विद्यार्थ्यांना संगणकाचे शिक्षण दिले जाते. इ. १ ली ते ४ च्या तीन तुकड्यांमध्ये सेमी इंग्रजीचे माध्यमातून शिक्षण दिले जाते आणि प्रत्येकी एक वर्ग मराठी माध्यमाचा घेतला जातो. शाळेत ई-लर्निंगच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना शिकविले जाते.
* दि. १३ जून २०१८ पासून सन २०१८-१९ चे शैक्षणिक वर्ष सुरू झाले. मा. मुख्याध्यापिका सौ. प्रज्ञा मोने बाई यांनी इ. १ ली च्या विद्यार्थ्यांचे गुलाबपुष्प देऊन स्वागत केले. तसेच इ. १ ली ते ४ थी च्या सर्व विद्यार्थ्यांना सर्व शिक्षा अभियानांतर्गत मोफत पाठ्यपुस्तके वाटण्यात आली.
* दि. ३ जानेवारी २०१८ ते ६ जानेवारी २०१८ दरम्यान संस्थेच्या स. वा. जोशी, डोंबिवली क्रीडांगणावर क्रीडा स्पर्धा घेण्यात आल्या. त्या धावण्याच्या स्पर्धेत आपल्या शाळेतील कु. निधी राठोड (४ थी ब) हिचा द्वितीय क्रमांक व चिराग गायकवाड (४ थी क) याचा तृतीय क्रमांक आला. 'चेंडू फेकणे' या स्पर्धेत कु. प्रांजल पाटील (४ थी ब) व हर्षल भोईर ( ४ थी ड) यांचा प्रथम क्रमांक आला.
* कै. नारायण अच्युत जावडेकर स्मृतिप्रीत्यर्थ संस्थेने आयोजित केलेल्या निबंध स्पर्धेत शाळेतील सहा. शिक्षिका श्रीम. प्रियदर्शनी पष्टे यांना पारितोषिक मिळाले.
* दि. १० जानेवारी २०१८ रोजी संस्थेच्या मो. ह. विद्यालय, ठाणे येथे झालेल्या श्री. श्री. ज. बापट वक्तृत्व स्पर्धेत आपल्या शाळेतील कु. ओवी महाजन (२/अ) व चिन्मय चौधरी (४/क) परितोषिकाचे मानकरी ठरले.
* १० फेब्रुवारी २०१८ रोजी पालक-शिक्षक संघातर्फे विद्यार्थ्यांच्या स्पर्धांचा पारितोषिक वितरण समारंभ आयोजित केला. क. डों. म. पा. च्या नगरसेविका मा. सौ. वैशाली पाटील यांच्या हस्ते पारितोषिक वितरण करण्यात आले.
* दि. १७ मार्च ते २२ मार्च हा आठवडा 'जलदिन' म्हणून साजरा करण्यात आला. त्यावेळी सदर विषयास अनुसरून चित्रकला स्पर्धा आयोजित करण्यात आली होती.
* दि. २१ जून हा दिवस 'आंतरराष्ट्रीय योग दिन' म्हणून साजरा करण्यात आला. सकाळ अधिवेशनाला सौ. मनिषा भोपटकर व दुपार अधिवेशनाला सौ. आशा पाटील व त्यांचे सहकारी योग शिक्षकांनी विद्यार्थ्यांना योगाचे महत्त्व सांगून योग प्रात्यक्षिके करून घेतली.
* ३० जून २०१८ रोजी इ. १ ली ते ४ थी च्या

वर्गांची नवीन शैक्षणिक वर्षातील पहिली पालक सभा घेण्यात आली.

* ३ जुलै २०१८ रोजी कल्याण डोंबिवली महानगरपालिकेतर्फे आयोजित केलेल्या वृक्ष दिंडीत विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.
* १५ एप्रिल २०१८ रोजी घेण्यात आलेल्या इंग्रजी मॅरेथॉन परीक्षेत आपल्या शाळेतील बरेच विद्यार्थी गुणवत्ता यादीत झळकले. राज्य गुणवत्ता यादीत झळकलेले आपले विद्यार्थी -

  कु. धीरज संजय वायकूळ (चौथा क्रमांक), कु. वरद सं चव्हाण (चौथा क्रमांक), कु. चार्वी रो. ढवळे (प्रथम क्रमांक), कु. ओंकार दि. शेवाळे (प्रथम क्रमांक) याशिवाय कु. मिहीर रा. पाटील, कु. स्वानंद सु. सुतार, कु. चिन्मय पं. चौधरी, कु. पार्थ न. आव्हाड या विद्यार्थ्यांनीही सुयश संपादन केले. सर्व विद्यार्थ्यांचे शाळेच्या मुख्याध्यापिका सौ. मोने बाईंनी कौतुक केले.
* यंदाच्या 'मराठा मंदिर ज्ञानपीठ' तर्फे घेण्यात येणाऱ्या इ. ३ री व ४ थी ;च्या इंग्रजी विषयाच्या परीक्षेचा निकाल १००% लागला असून इ. ३ री मधीलकु.वेदवै.जोशी(५०पैकी५०गुणमिळवून)व **इ. ४ थी मधील कु. हर्ष अ. ससाणे (१०० पैकी १०० गुण मिळवून) हे विद्यार्थी प्रथम क्रमांकाचे** मानकरी ठरले.
* 'मराठा मंदिर ज्ञानपीठ' तर्फे घेण्यात येणाऱ्या यंदाच्या गणित विषयाच्या परीक्षेचा निकाल १००% लागला असून इ. ३ री मधील कु. संजना सं. धोंगडे ही विद्यार्थीनी ५० पैकी ५० गुण मिळवून प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झाली.
* २५ जुलै २०१८ रोजी इ. १ ली ते ४ थी च्या सर्व विद्यार्थ्यांनी गुरुपौर्णिमा साजरी केली. शिक्षकांनी गुरू-शिष्यांच्या विविध गोष्टी सांगून गुरूंचे महत्त्व पटवून दिले.
* १ ऑगस्ट २०१८ रोजी लोकमान्य टिळक पुण्यतिथी साजरी करण्यात आली. वर्ग पातळीवर विद्यार्थ्यांची बौद्धिक स्पर्धा घेऊन विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देण्यात आले.
* ११ ऑगस्ट २०१८ - बापट सभागृहात दिव्यांची आरास करून दीपपूजा हा उपक्रम साजरा करण्यात आला.
* स्टूडंट्स ऑलंपिक असोसिएशन, ठाणे डिस्ट्रिक्ट तर्फे आयोजित तायक्वांडो स्पर्धेत कु. सई तांबे (४/अ) हिला द्वितीय क्रमांकाचे परितोषिक मिळाले. व रौप्य पदक देऊन गौरविण्यात आले.
* १५ ऑगस्ट २०१८ - भारताचा ७२ वा स्वातंत्र्यदिनसाजरा करण्यात आला. ध्वजारोहण प्राथमिक विभागाच्या मा. सौ. मोने बाई यांच्या शुभहस्त करण्यात आले.
* संस्थेच्या शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी संघातर्फे आयोजित केलेल्या रांगोळी स्पर्धेत शाळेतील सहा. शिक्षिका सौ. चारुशिला वंडेकर यांना द्वितीय क्रमांकाचे पारितोषिक मिळाले.
* बालक मंदिर संस्थेतर्फे आयोजित करण्यात आलेल्या हस्ताक्षर स्पर्धेत कु. दीप्ती सं. धामणकर (२ री) या विद्यार्थीनीस प्रथम क्रमांकाचे बक्षीस मिळाले. रंगभरण स्पर्धेत कु. हिमांशी म. पाटील या विद्यार्थीनीस उत्तेजनार्थ बक्षीस मिळाले.
* १ सप्टेंबर २०१८ - 'गोपाळकाला' निमित्त दहीहंडीचे आयोजन करून विद्यार्थ्यांना दहीपोह्यांचा प्रसाद देण्यात आला.
* ५ सप्टेंबर २०१८ - या दिवशी शिक्षक दिन साजरा करण्यात आला. या दिवशी शिक्षकांना फूल, पेढे, नारळ देऊन सन्मानित करण्यात आले. तसेच शिक्षकांसाठी 'वर्तुळात रिंग टाकणे' ही स्पर्धा घेण्यात आली. त्यात पुढील शिक्षक बक्षीसपात्र ठरले. शाळेच्या वतीने त्यांचे अभिनंदन!

  सौ. सुकेशिनी वाघमारे (प्रथम), सौ. प्रियांका मराठे (द्वितीय), सौ. पूजा चौधरी (तृतीय)
* ८ सप्टेंबर २०१८ - मातृदिनानिमित्त पालक-शिक्षक संघातर्फे 'एकाआड एक मराठी व इंग्रजी अंक म्हणणे' ही स्पर्धा आयोजित करण्यात आली. या स्पर्धेत पुढील पालक विजयी झाले. शाळेच्या वतीने त्यांचे अभिनंदन!

सौ. संपदा कोळसे (प्रथम), सौ. शुभांगी एडेकर (द्वितीय), सौ. निलिमा भंडारी (तृतीय)

* २१ सप्टेंबर २०१८ - सार्वजनिक गणेशोत्सव सुभेदार वाडा मंडळातर्फे आयोजित 'आधी वंदू तूज मोरया' या कार्यक्रमात पूर्व प्राथमिक व प्राथमिक विभागातील विद्यार्थी व शिक्षकांनी भक्तीगीतांचे गायन केले.

* नवनीत चित्रकला स्पर्धेत खालील विद्यार्थ्यांनी भरघोस यश मिळवून पारितोषिके पटकावली.

  युवा मास्टरस्ट्रोक स्पर्धा (गट अ) - इ. १ ली ते ३ री कु. ईशिता कवडे , कु. उत्कर्षा गावित (२/ब), कु. हिमांशी पाटील (२/क), कु. अस्मिता मोहिते, कु. ओंकार पाटील, कु. निधी पाटील, कु. साक्षी लष्करी, कु. तन्मय येवले, कु. देवश्री अरुणावतीकर

  गट - ब (इ. ४ थी) : कु. अतुल दराडे, कु. रिया परब, कु. प्राची कदम, कु. नंदिनी भताने,

  गटनिहाय विजेते -

  गट अ - कु. निधी पाटील, गट ब - कु. रिया परब

* स्वच्छ भारत अभियानांतर्गत इ. ३ री च्या विद्यार्थ्यांची चित्रकला स्पर्धा घेण्यात आली. यात पुढील विद्यार्थ्यांना बक्षिसे मिळाली. - कु. पियुष बेरडिया (प्रथम), कु.. मीत जाधव (द्वितीय), कु. दृष्टी भोईर (तृतीय), कु. चैतन्या जाधव (उत्तेजनार्थ)

  इ. ४ थी च्या विद्यार्थ्यांची सदर विषयास अनुसरून निबंध स्पर्धा घेण्यात आली. या स्पर्धेत पुढील विद्यार्थ्यांना बक्षिसे मिळाली.

  कु. संजना धोंगडे (प्रथम), कु. नुपूर चौधरी (द्वितीय), कु. आर्या वाकोरे (तृतीय), कु. सार्थक कदम (उत्तेजनार्थ)

* महाराष्ट्र राज्य बाल चित्रकला स्पर्धा घेण्यात आली. त्या स्पर्धेमधे खालील विद्यार्थ्यांची नावे C.R.C. क्र. ३ मध्ये देण्यात आली.

  गट-२ : कु. खुशाल भिवंडीकर (प्रथम) कु. धिरज संवायकुळ (द्वितीय), कु. मनस्वी वि. अहिरराव (तृतीय)

  गट-३

  कु. वैष्णवी रा. चौधरी (प्रथम), कु. जान्हवी रा. मिसाळ (द्वितीय), कु. वैदिक रा. भंडारी (तृतीय)

* २५ सप्टेंबर २०१८ - संस्थेचे संस्थापक कै. गो. ना. अक्षीकर यांची जयंती साजरी करण्यात आली. तसेच हे औचित्य साधून पारितोषिक वितरण करण्यात आले. इ. १० वी व १२ वी च्या विद्यार्थ्यांचे सत्कार, नेने ढाल व अग्रवाल ढाल ही पारितोषिके प्रदान करून विद्यार्थी व शिक्षकांना गौरविण्यात आले.

* महाराष्ट्र राज्य भारत स्काऊट्स आणि गाईड्स आयोजित बुलबुल पथकाचे प्रशिक्षण दि. २७/९/२०१८ ते ३/१०/२०१८ या कालावधीत सहा. शिक्षिका सौ. ज्योती पवार यांनी पूर्ण केले.

* एल्. आय. सी. संस्थेतर्फे रंगभरण व हस्ताक्षर स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. कु. सार्थक शि. परब या विद्यार्थ्यास 'सर्वश्रेष्ठ छात्र' पुरस्काराने गौरविण्यात आले.

* सालाबादप्रमाणे 'श्री संत राममारुती महाराज' पुण्यतिथीनिमित्त २७ सप्टेंबर रोजी श्री महागणपती अथर्वशीर्षाची सामुदायिक आवर्तने करण्याचा लाभ इ. ४ थी च्या विद्यार्थ्यांना मिळाला.

* २ ऑक्टोबर २०१८ - म. गांधी व लालबहादूर शास्त्री यांची जयंती साजरी करण्यात आली. C.R.C. क्र. ३ पासून कल्याण - डोबिवली महापालिकेच्या कार्यालयापर्यंत विद्यार्थ्यांनी प्रभातफेरी काढली. नेत्यांची माहिती सांगून 'स्वच्छता व स्वावलंबनाचे महत्त्व' सांगण्यात आले. विद्यार्थ्यांनी स्वच्छतेवर घोषवाक्ये म्हटली.

* ६ ऑक्टोबर २०१८ - विद्यार्थ्यांच्या सर्जनशीलतेला निरीक्षण क्षमतेला वैज्ञानिक दृष्टी वृद्धीला चालना मिळण्यासाठी 'कल्पकता व विज्ञान' या विषयावर आधारित शैक्षणिक प्रकल्प आयोजित केला होता. विद्यार्थ्यांचा सहभाग मोठ्या प्रमाणावर लाभला.

* १३ ऑक्टोबर २०१८ - नवरात्रीनिमित्त मुलींच्या

मांडल्याचे आयोजन करण्यात आले. रुचकर खिरापत आणि खाऊचे वाटप करण्यात आले.

* १५ ऑक्टोबर २०१८ - भारतरत्न डॉ. ए. पी. जे. अब्दूल कलाम यांच्या जयंतीनिमित्त 'वाचन प्रेरणा दिन' साजरा करण्यात आला. विद्यार्थ्यांना वाचन, स्वच्छता, चांगल्या सवयीचे महत्त्व पटवून देण्यात आले.
* २० ऑक्टोबर २०१८ रोजी 'गोवर- रुबेला' लसीकरण प्रचारार्थ प्रभातफेरी काढण्यात आली. तसेच विद्यार्थ्यांची चित्रकला व मेहेंदी स्पर्धा घेण्यात आली.
* दि. ३१ ऑक्टोबर २०१८ ते दि. ३ नोव्हेंबर २०१८ या कालावधी प्रथम सत्रांत परीक्षा घेण्यात आली.
* ४ नोव्हेंबर २०१८ - इ. १ ली ते इ. ४ थी च्या विद्यार्थ्यांची 'इंग्रजी मॅरेथॉन' स्पर्धा घेण्यात आली.
* ५ नोव्हेंबर२०१८ ते २२ नोव्हेंबर २०१८ या कालावधीत दीपावली निमित्त शाळेला सुट्टी देण्यात आली.
* २६ नोव्हेंबर रोजी 'भारतीय संविधान दिवस' साजरा करण्यात आला.
* **२७ नोव्हेंबर २०१८ रोजी इ. १ ली ते ४ थी च्या विद्यार्थ्यांना गोवर-रुबेला ची लस टोचण्यात आली.**
* २९ नोव्हेंबर २०१८ रोजी 'ठाणे वैभव शिखर आर्ट' तर्फे इ. १ ली ते ४ थी च्या विद्यार्थ्यांची चित्रकला स्पर्धा घेण्यात आली.
* २९ नोव्हेंबर रोजी कल्याण डोंबिवली महानगरपालिकेतर्फे शाळा क्र. १ येथे विज्ञान प्रदर्शन आयोजित करण्यात आले होते. त्यात आपल्या शाळेच्या सहा. शिक्षिका सौ. गायत्री भामरे यांच्या मार्गदर्शनाखाली इ. ३ री ची विद्यार्थीनी कु. जान्हवी धोरण व इ. ४ थी ची विद्यार्थीनी कु. सिद्धी प्रभाळे यांनी वाहतूक साधने व दळणवळण हा प्रकल्प सादर केला.
* दि. १ डिसेंबर २०१८ रोजी प्रारंभ कला अकॅडमी, ठाणे आयोजित शिक्षक महिलांसाठी स्पर्धा घेण्यात आल्या. त्यात पुढील शिक्षिका बक्षीसपात्र ठरल्या.

  स्पर्धा - संगीत खुर्ची

  सौ. कल्पना सं पोतदार (प्रथम), सौ. दीपा दि. राक्षे (द्वितीय), श्रीमती सुलभा सु. थोरात (तृतीय)

  स्पर्धा - कमीत कमी वेळात धान्ये ओळखणे

  सौ. दीपा दि. राक्षे (प्रथम), सौ. प्रियांका रा. मराठे (द्वितीय), सौ. शमिका कां खटावकर (तृतीय)
* दि. ११ डिसेंबर ते १४ डिसेंबर या कालावधीत क्रीडा स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. विजयी विद्यार्थ्यांना मुख्याध्यापिका सौ. प्रज्ञा मोने बाईंच्या हस्ते पारितोषिके प्रदान करण्यात आली.

पालक-शिक्षक संघ व शाळा व्यवस्थापन समितीतील पालक प्रतिनिधींचे शाळेच्या प्रगतीसाठी वेळोवेळी साहाय्य लाभते.

शाळेच्या प्रेमापोटी सर्व हितचिंतक, आजी - माजी पालक, शाळेच्या प्रगतीसाठी उत्तम प्रकारे सहकार्य करतात. शाळा सर्वांची ऋणी आहे.

अशा विशाल वटवृक्षाला समृद्धी आणि यशाच्या उत्तुंग शिखराकडे वाटचाल करण्यासाठी, संस्था, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, पालक व आपले बालगोपाळ सतत प्रयत्नशील असतात. त्यांना सुयश मिळो ही ईश्वरचरणी प्रार्थना!

धन्यवाद!

**सौ. प्रज्ञा प्रमोद मोने**
मुख्याध्यापिका
ज.ए.इ.ची प्राथमिक शाळा,
सुभेदार वाडा, कल्याण (प.)

संकलन : **सौ. प्रियांका राम मराठे**
(सहा. शिक्षिका)